# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 January 2026

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

सोमनाथ स्वाभिमान पर्व हा कोट्यवधी भारतीयांच्या शाश्वत श्रद्धा, साधना आणि अतूट संकल्पाचं जिवंत प्रतीक असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज गुजरातच्या तीन दिवसीय दौऱ्यात आज दुस–या दिवशी सकाळी वेरावळ जिल्ह्यातील प्रभास पाटन मधील सोमनाथच्या शिवमंदीरातील समारंभात सहभाग घेतला, त्यावेळी ते बोलत होते. पवित्र श्री सोमनाथ मंदिरात या महापर्वात सहभागी होणे हा माझ्या जीवनातील अविस्मरणीय आणि अमूल्य क्षण आहे, असंही त्यांनी यावेळी नमुद केलं. मोदी यांनी सोमनाथ स्वाभिमान पर्वांतर्गत सकाळी आयोजित, शौर्य यात्रेत सहभाग नोंदवला. शतकानुशतके सोमनाथच्या मंदीराच्या रक्षणार्थ प्राणांची आहुती दिलेल्या असंख्य लढवय्यांच्या स्मृतीनिमित्त या सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होते.

****

मुंबई महापालिका निवडणूकीचा महायुतीचा वचननामा आज मुंबईत थोड्यावेळेपूर्वी प्रकाशित करण्यात आला. यानिमित्त आयोजित वार्ताहर परिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले प्रमुख उपस्थित होते. कचरामुक्त मुंबईसह मुंबईचा पाणी प्रश्न मिटवण्यासह मिठी नदी स्वच्छ करण्याचं काम केलं जाईल असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी बोलतांना नमूद केलं. बेस्ट बस आणि मेट्रोचं जाळं वाढवण्यासह आरोग्य क्षेत्रात भरीव काम करणार असल्याचं सांगून मुंबईत राहणारा मराठी माणूस बाहेर जणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी बोलतांना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी, बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी निमित्त वैद्यकीय विद्यापीठ तयार करणार असल्याचं सांगून लघु उद्योजकांना पाच लाख रुपये बिनव्याजी कर्ज देणार असल्याचं ते म्हणाले.

****

राज्यात २९ महापालिकांची निवडणूक चार दिवसांवर आलेली असताना प्रचार आता शिगेला पोहचत आहे. आज मतदानाआधीच्या रविवार– सुटीच्या दिवशी विविध राजकीय पक्ष, उमेदवारांनी प्रचारांसाठी सकाळपासून उपक्रम सुरू केले आहेत. प्रचार फेऱ्यांना प्रारंभ झाला आहे. कोपरा सभा होणार आहेत. प्रमुख नेते झंझावाती प्रचार दौरे करत आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल रात्री नाशिक इथं घेतलेल्या प्रचार सभेत राज्य शासनाची लाडकी बहिण योजना कधीच बंद होवू देणार नाही, अशी ग्वाही दिली.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातील ४२ मतदान केंद्रे संवेदनशील असल्याची यादी पोलिस प्रशासनानं महानगर पालिका प्रशासनाकडे सुपूर्द केली आहे. या सर्व मतदान केंद्र परिसरात सी.सी.टी.व्ही. बसवण्याचे काम सुरू करणार असल्याचं महापालिकेतर्फे सांगण्यात आलं आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज दुपारी तीन वाजता छत्रपती संभाजीनगर इथं  टी.व्ही. सेंटर मैदानावर जाहिर प्रचार सभा होत आहे.

****

अर्थसंकल्पपूर्व प्रक्रियेचा भाग म्हणून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांची बैठक काल झाली. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी आणि अन्य वरिष्ठ अधिकारीही या बैठकीस उपस्थित होते. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारीला सुरू होणार आहे. तर, केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी एक फेब्रुवारी २०२६ रोजी सादर होईल. प्रस्तावित अर्थ संकल्पाबाबत नागरिकांना आपले विचार आणि सूचना व्यक्त करण्यासाठी माय जीओव्ही संकेतस्थाळाचा उपयोग करता येईल असं केंद्रीय अर्थ मंत्रालयातर्फे जाहिर करण्यात आलं आहे. येत्या शुक्रवारी सोळा जानेवारी रोजी सायंकाळी पर्यंत याची मुदत असणार आहे.

****

भारतानं स्वत:च्या स्वच्छ ऊर्जेच्या प्रयत्नात एक नवा विक्रम प्रस्थापित करत जिवाश्म इंधन –व्यतीरिक्त स्थापित क्षमता २६६ पुर्णांक ७८ गिगावॉटपर्यंत वाढलेली आहे. केंद्रीय नविन आणि नवीनीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सामाजिक संपर्क माध्यमाद्वारे ही माहिती जाहिर केली आहे. यात वर्षात ४९ पूर्णांक १२ गिगावॅटची नवीन जीवाश्म–इंधन–व्यतिरिक्त क्षमता जोडली गेलेली असल्याचंही त्यांनी सांगितलं आहे.

****

भारत–न्यूझीलंड यांच्या क्रिकेटच्या पुरुष संघात तीन एकदिवसीय आणि पाच टी–ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेस आजपासून प्रारंभ होत आहे. आज वडोदरा इथं थोड्याच वेळात म्हणजे दुपारी दीड वाजता पहिला एकदिवसीय सामना सुरु होईल. रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गील तसंच या मालिकेतला उप कर्णधार श्रेयस अय्यर संघात आहेत. काल सरावावेळी झालेल्या दुखापतीमुळं यष्टीरक्षक ऋषभ पंत याला मालिकेतून बाहेर पडावं लागलं आहे.

****

सध्या राज्यात कोरडं हवामान असून किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. फक्त, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी येत्या १८ तासांत हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****